| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **CNR No.MHKO200001012022** | दाखल तारीख | – | ०५ | ०३ | २०२२ |
| | नोंदणी तारीख | – | ०५ | ०३ | २०२२ |
| | निकाल तारीख | – | १४ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०४ | ०२ | ०९ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात ( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमीत फौजदारी खटला क्रं.१६/२०२२**
**न्यायनिर्णय नि.क्र.३१/ब**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १४ मे २०२६.**

शाहुवाडी पोलीस ठाणे,ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर गु.र.नं.२१२/२०२१ भारतीय दंड संहिता कलम ३५४(ब),३२३,५०४ सह कलम ३४ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>शाहुवाडह पोलीस ठाणे, ता.शाहुवाडी<br>जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री.पी.एच. सावंत |
| आरोपी | १. | हैबती उर्फ प्रकाश बळवंत उर्फ बाळू पाटील, व.व. ३४ |
| | २. | लक्ष्मण आनंदा पाटील, व.व. ३४ |
| | | दोघे रा. माळापुडे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर. |
| आरोपींतर्फे वकील | | ॲड. श्री. के.बी.देसाई |

**भाग–ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०१.०८.२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०२.०८.२०२१ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र न्यायालयात पाठविल्याचा दिनांक | :– | ०५.०३.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | १६.०८.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २७.०५.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हैबती उर्फ प्रकाश बळवंत उर्फ बाळू पाटील | ०४.०८.२०२१ | ०४.०८.२०२१ | भा.दं.वि. संहिता कलम ३५४(ब), ३२३,५०४, सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| २. | लक्ष्मण आनंदा पाटील | ०४.०८.२०२१ | ०४.०८.२०२१ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |

**<u>भाग–क</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | **''X'' (गोपनीयतेकरिता)** | फिर्यादी | १९ |
| २. | सखाराम गणपती वडींगेकर | साक्षीदार | २५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | प्रविण श्रीपती वडींगेकर | साक्षीदार | २६ |
| ४. | रविंद्र महिपती वडींगेकर | साक्षीदार | २७ |
| ५. | रजनीकांत संतराम पाटील | साक्षीदार | २८ |

**ब. बचाव पक्ष**

| **सा.क्रं.** | **साक्षीदारांचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

**क. न्यायालय**

| **सा.क्रं.** | **साक्षीदारांचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

## अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी

**अ. अभियोगपक्ष (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | २० | तक्रार |
| २. | २१ | फिर्यादीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ प्रमाणे न्यायालयालयात दि.०३/०९/२०२१ रोजी नोंदवलेला जबाब |

**ब. बचावपक्ष (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**क. अभियोगपक्ष (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोप पत्र |
| २. | ८ | दोषारोप |
| ३. | ९ व १० | आरोपीचे निवेदन |
| ४. | २९ व ३० | आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब |

**ड.भौतिक वस्तु**

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल अर्टीकल नं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | आर्टिकल अ | एक काळया रंगाचा पुढील बटणाचा हाफ बाहयांचा ब्लाऊज. |

**<u>न्या य नि र्ण य</u>**
**(दिनांक १४/०५/२०२६ रोजी घोषित)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४(ब),३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची संपरिक्षा दाखल आहे.

**०२.** विनयभंग अथवा लैगिंक गुन्हयातील पीडितेचा सामाजिक छळ किंवा बहिष्कार रोखण्याचा सामाजिक उद्देश लक्षात घेऊन, न्यायालयाने निकालात पीडीतेचे नाव न दर्शवणे बंधनकारक आहे असे निर्देशित केल्यामुळे. या न्यायालयाने तिचे वर्णन निकालात ''X'' असे करणे ठरवले आहे.

**०३.** अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दि.०१.०८.२०२१ रोजी सायंकाळी ६.४५ च्या सुमारास फिर्यादी बोरींगवरून पाणी घेवून घरी येत असताना फिर्यादी घराजवळ आली असताना तिचे पती सखाराम यांना लक्ष्मण आनंदा पाटील, हैबती बळवंत पाटील हे दोघे लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत होते. ते त्यांचे पती सखाराम यांना सोडविण्यास गेल्या असता हैबती बळवंत पाटील याने फिर्यादीला तुझ्या आईला झवली अशी शिवीगाळ देवून त्याने फिर्यादीला धक्काबुक्की करून तिच्या गळयातील मणी मंगळसुत्र व सोन्याचे मणी असलेले दो-यातील माळ तोडली व तिच्या ब्लाऊजमध्ये हात घालून तिला लज्ञा उत्पन्न होईल असे वर्तन केले. त्यावेळी तिचे पती तिला सोडवायला आले असता लक्ष्मण आनंदा पाटील

यांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांच्या गळयातील सोन्याची चेन तोडून टाकली. त्यावेळेस तेथे असणारे रविंद्र महिपती वडींगेकर, प्रविण श्रीपती वडींगेकर व इतर लोकांनी फिर्यादी व फिर्यादीचे पती यांना आरोपींच्या तावडीतून सोडवले. सबब, दि. ०१.०८.२०२१ रोजी आरोपींनी मागील झालेल्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीच्या पतीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व फिर्यादीला धक्काबुक्की शिवीगाळ करून त्यांच्या ब्लाऊज मध्ये हात घालून तिला लज्ज्ञा उत्पन्न होईल असे वर्तन केले आहे म्हणून त्यांनी आरोपींविरूध्द प्रस्तुतची केस शाहूवाडी पोलीस स्टेशनला दाखल केली आहे.

**०४.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन शाहुवाडी पोलीस ठाणेत आरोपींविरुध्द गु.र.न.२१२/२०२१ भारतीय दंड विधान संहिता कलम ३५४,३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा दाखल झाला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस नाईक १०२४ आर.जी. माने यांनी केला असुन तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, कपडे जप्तीचा पंचनामा केला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्रे प्राप्त केली, तसेच आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त केली व केलेल्या तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**०५.** माझे पूर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.८ नुसार भारतीय दंड संहिताचे शिक्षापात्र कलम ३५४(ब),३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवुन आरोपींना दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. तसे आरोपींचे निवेदन नि.क्र.९ व १० वर नोंदविण्यात आले.

**०६.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेसाठी एकुण पाच साक्षीदारांचा साक्षीपुरावा नोंदवला असुन अभियोगपक्षाने कांही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंतीवरुन नि.क्र.१ कडे दि.१६/०३/२०२६ रोजी आदेश पारित करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. तद्नंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन (नि.क्र. २९ व ३०) कडे नोंदवले असता आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला परंतु, आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहे –

| **अ.क्र** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतात का की, दि.०१/०८/२०२१ रोजी सायंकाळी ६.४५ चे सुमारास फिर्यादी ''X" ही बोरींगवरून पाणी घेवून घरी येत असताना आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुरःसरनार्थ फिर्यादीला विवस्त्र करण्याच्या उद्देशाने आरोपी क्रं.१ हैबती उर्फ प्रकाश बळवंत उर्फ बाळू पाटील याने फिर्यादीवर हल्ला करुन फौजदारी बल वापरुन फिर्यादीचे ब्लाऊजमध्ये हात घालुन फिर्यादीचा ब्लाऊज फाडून तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले व त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३५४(ब) सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | अभियोग पक्ष हे शाबीत करते काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी, आरोपी यांनी त्यांचे समान उद्देशाचे पुर:सरणार्थ आरोपी क्रं.१ हैबती | |

| | | |
|---|---|---|
| | उर्फ प्रकाश बळवंत उर्फ बाळू पाटील याने फिर्यादीला व तिच्या पतीला लाथाबुक्कयांनी मारहाण करुन स्वेच्छेने दुखापत पोहोचवली व त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्ष हे शाबीत करते काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्देशाचे पुरःसरनार्थ फिर्यादीस व साक्षीदारास उद्देशपुर्वक अपमानीत करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य केले व त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करणेत येते. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ करीताः</u>**

**०८.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपींचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०९.** अभियोगपक्षातर्फे मुख्य साक्षीदार क्रं.१ फिर्यादी ''X'' **(फिर्यादी/नि.क्र.१९)** यांचे मौखीकपुराव्यामध्ये असे आले आहे की, ती

आरोपी क्रं. १ व २ यांना ओळखते ते तिच्या गावातील राहणारे आहेत. दिनांक ०१/०८/२०२१ रोजी तिचे पती व ओरोपींमध्ये भांडण झाले होते. सदर भांडणामध्ये आरोपींनी तिच्या पतीच्या डोळयाला व हाताला इजा पोहचवली होती. त्याबाबत त्यांनी तक्रार दिलेली नव्हती. संध्याकाळचे वेळेस फिर्यादी पाणी आणणेकरीता गेली होती. त्यावेळी तिचे पती दारात उभे होते. फिर्यादी पाणी घेवुन परत आली त्यावेळी तिच्या पतीला आरोपी व गल्लीतील इतर लोक मारत होते. घटना चालू होती त्यावेळी फिर्यादी सोडवायला गेली तेंव्हा आरोपी क्र १ ने तिच्या गळयातील मंगळसुत्र ओढले. त्यानंतर तिच्या दोन पुतण्यांनी भांडणाची सोडवासोडव केली. या व्यतिरिक्त दुसरी कोणतीही घटना घडली नाही तिला शाहुवाडी पोलीस स्टेशनला दिलेली तक्रार दाखवली ती तीच आहे. त्यावर तिचा निशाणी डावा अंगठा आहे. त्यातील मजकुर पोलीसांनी तिच्या सांगण्यावरुन नोंदवुन घेतला होता असे कथन केले आहे. ती फिर्याद दिलेनंतर तिचा न्यायालयात देखील फौ.प्र.सं. क. १६४ अन्वये जबाब नोंदवणेत आला होता. तिला सदरचा जबाब दाखविला. तो तोच आहे त्यातील मजकुर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो खरा व बरोबर आहे. घटना घडली त्यावेळी जो ब्लाऊज दाखवला तो तोच आहे त्यास आर्टीकल अ देण्यात आले आहे.

१०. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ सखाराम गणपती वडींगेकर **(साक्षीदार/नि.क्र.२५)** यांनी त्यांचे साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, मंगल वडिंगेकर ही त्यांची पत्नी आहे. दि. ०१/०८/२०२१ रोजी रात्री ६.४५ चे दरम्यान फिर्यादी व आरोपींमध्ये किरकोळ बाचाबाची झाली. त्यांच्यामध्ये शाब्दीक बोलचाल झाली. सदरची बोलचाल वाढत गेली व आरोपी हैबती पाटील हे मधे भांडणात आले. त्या ठिकाणी ते एकटेच होते. हैबतीने

त्यांना मारहान करणेस सुरुवात केली त्यावेळी त्याची पत्नी मधे आली व भांडणाची सोडवासोडव करीत असताना त्याची पत्नी मंगल हिला आरोपीने झोंबाझोंबी केली व तिच्या गळयातील मंगळसूत्र तोडले. त्यातील अर्धे मंगळसुत्र सापडले व अर्धे मंगळसुत्र गहाळ झाले.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ प्रविण श्रीपती वडींगेकर **(साक्षीदार/नि.क्र.२६)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, मंगल वडिंगेकर ही त्यांची चुलती आहे. दि ०१/०८/२०२१ रोजी रात्री ६.४५ चे दरम्यान फिर्यादी व आरोपींमध्ये किरकोळ बाचाबाची झाली. त्यांच्यामध्ये शाब्दीक बोलचाल झाली. ते ज्यावेळी कामावरुन आले त्यावेळी पिफर्यादी व आरोपी यांच्यामधील भांडणे संपली होती. त्यांच्यातील भांडणे त्याने प्रत्यक्ष पाहिली नाहीत. पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदवून घेतला नाही.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ रविंद्र महिपती वडिंगेकर **(साक्षीदार/नि.क्र.२७)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, मंगल वडिंगेकर ही त्यांची चुलती आहे. दि ०१/०८/२०२१ रोजी रात्री ६.४५ चे दरम्यान फिर्यादी व तुम्हा आरोपींमध्ये किरकोळ बाचाबाची झाली. त्यांच्या मध्ये शाब्दीक बोलचाल झाली. ते ज्यावेळी कामावरुन आले त्यावेळी फिर्यादी व आरोपी यांच्यामधील भांडणे संपली होती. त्यांच्यातील भांडणे त्याने प्रत्यक्ष पाहिली नाहीत. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदवून घेतला नाही.

**१३.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ रजनिकांत संतराम पाटील **(साक्षीदार/नि.क्र.२८)** यांचे साक्षी पुराव्यामध्ये असे आले आहे की, आरोपी व पिफर्यादी हे त्यांच्या गल्लीत राहणारे आहेत. ते मंगल वडिंगेकर यांना ओोळखतात. दि. ०१/०८/२०२१ रोजी रात्री ६.४५ चे दरम्यान पिफर्यादी व आरोपींमध्ये किरकोळ बाचाबाची झाली त्यावेळी ते गाडीवर होते. त्यांच्यातील

भांडणे त्याने प्रत्यक्ष पाहिली नाहीत. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदवून घेतला नाही.

**१४.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे साक्षीदारांचा उलटतपास पुढीलप्रमाणे –

**१५.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ ''X'' **(फिर्यादी/नि.क्र.१९)** यांचे आरोपीचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, घटनेच्या आधी पंधरा दिवस फिर्यादीच्या मालकांचे व आरोपी क्रं. २ चे भांडण झाले होते. सदर भांडणामध्ये आरोपी क्रं. २ ला फिर्यादीच्या मालकांनी शिवीगाळ केली होती. एक तारखेला सायंकाळी ५ ते ५.३० च्या सुमारास त्यांच्या पतीने आरोपी क्रं. २ ला काठीने मारहाण केली होती. त्यावेळी त्यांचा पुतण्या अक्षय व मुलगा रविंद्र हे त्यांच्या पतीसोबत होते. त्यांचे घर व आरोपी क्रं. २ चे घर वेगवेगळया गल्लीत आहे. आरोपी क्रं. २ ला त्यांच्या पतीने मारल्यानंतर तो त्यांच्या घरी निघून गेला. त्यानंतर तो त्यांच्या घरी कधीही आला नाही. फिर्यादीची मानसिक स्थिती बरी नाही असे सांगून त्यांनी पोलीसांना पुरवणी जबाब व न्यायालयीन जबाब नंतर दिला होता. उर्वरीत प्रश्नांना त्यांनी नाकबुल उत्तरे नोंदवली.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ सखाराम गणपती वडींगेकर **(साक्षीदार/नि.क्र.२५)** यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नसल्याने त्यांची साक्ष अभियोग पक्षाकरीता निरूपयोगी ठरलेली आहे. त्यांनी प्रस्तुतची फिर्याद ही त्यांच्या पत्नीने गैरसमजूतीतून दिल्याची बाब मान्य केली. त्याचबरोबर

साक्षीदार क्रं.३ प्रविण श्रीपती वडींगेकर **(साक्षीदार/नि.२६)** व साक्षीदार क्रं.४ रविंद्र महिपती वडींगेकर **(साक्षीदार/नि.२७)** व साक्षीदार क्रं.५ रजनीकांत संतराम पाटील **(साक्षीदार/नि.२८)** या तीन्ही साक्षीदारांनी देखील अभियोग पक्षास सहाय्य केले नसल्याने त्यांची साक्ष अभियोग पक्षाकरीता निरूपयोगी ठरलेली आहे. अभियोग पक्षाकडून घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये वर नमूद तीनही साक्षीदारांनी असे मान्य केले की, फिर्यादी ही त्यांची चुलती असून फिर्यादी व आरोपींमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाले होते. त्यामुळे त्यांच्या चुलतीने गैरसमजूतीतून आरोपींविरूध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली होती.

**१७.** एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ फिर्यादी यांच्यात व आरोपींमध्ये पुर्वी असलेल्या वादातुन प्रस्तुतची केसची निर्मिती झाल्याची बाब पुराव्याअंती समोर येते. फिर्यादीचे पती व आरोपी यांच्यामध्ये प्रस्तुतचे प्रकरण दाखल होण्यापूर्वी किरकोळ वाद झाले होते. प्रस्तुतची फिर्याद फिर्यादीने आरोपीविरुध्द दाखल करण्याचे कारण हे फिर्यादीचे पती व आरोपी यांच्यामधील पूर्वी असलेले भांडण व त्यातून निर्माण झालेली वैमनस्याची भावना या व इतर देखील बाबी आहेत. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ सखाराम वडींगेकर, साक्षीदार क्रं.३ प्रविण वडींगेकर, साक्षीदार क्रं.४ रविंद्र वडींगेकर, साक्षीदार क्रं.५ रजनीकांत पाटील हे फिर्यादीचे जवळचे नातलग असून त्यांनी अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणातील स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली नाही. त्याचबरोबर घटनास्थळ व जप्ती पंच तपासलेले नाही. अभियोग पक्षाने तपासी अंमलदार पोलीस नाईक आर.जी. माने यांचे देखील साक्ष अभिलेखावर

नोंदवलेली नाही. परंतु घटनास्थळावर उपस्थित असलेले स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांची साक्ष त्यांनी नोंदवलेली नाही. अशा परिस्थितीमध्ये अभियोगपक्षाचा पुरावा हा आरोपींनी त्यांचेवर दोषारोपीत केलेला गुन्हा केला आहे हे सिध्द होण्यास पुरेसा नाही. अभियोगपक्षाने कायद्याप्रमाणे फिर्यादीचे संपुर्ण कथन संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांमूळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, फिर्यादीला विवस्त्र करण्याच्या उद्देशाने आरोपी क्रं.१ हैबती उर्फ प्रकाश बाळू पाटील याने फिर्यादीवर हल्ला करुन फौजदारी बळ वापरुन फिर्यादीचे ब्लाऊजमध्ये हात घालुन फिर्यादीचा ब्लाऊज फाडून तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले, आरोपींनी फिर्यादीस मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पाहोचवली व वाईटवंगाळ शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचे संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षात जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **<u>प्रश्नबिंदू क्रं.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.</u>**

**<u>प्रश्नबिंदू क्र.४ करीताः</u>**

**१८.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ३ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३५४(ब),३२३,५०४ सह कलम ३४ प्रमाणे आरोपींवर असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे आरोपी क्रं.१ व २ हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक काळया रंगाचा पुढील बटणाचा हाफ बाहयांचा ब्लाऊज हा आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्नबिंदू क्र.४ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१. हैबती उर्फ प्रकाश बळवंत उर्फ बाळु पाटील, आरोपी क्र.२ लक्ष्मण आनंदा पाटील, दाघेही रा. माळापुडे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३५४(ब),३२३,५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपींची वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रक्कमेचा जामीन दयावा.

४. एक जप्त मुद्देमाल काळया रंगाचा पुढील बटणाचा हाफ बाहयांचा ब्लाऊज हा आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने त्याचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Viashali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.14 18:22:39 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

दिनांक –१४.०५.२०२६.
कळे–खेरीवडे.